# प्रथमच लोक बिरादरी प्रकल्प येथे
# 15 मे पासून श्रमसंस्कार शिबीर

बाबा आमटे यांच्या प्रेरणेतून गेली 42 वर्षे महारोगी सेवा समितीच्या सोमनाथ प्रकल्प, येथे श्रमसंस्कार छावणी शिबीर आयोजित केले जात आहे. या शिबीरात देशभरातून हजारो तरूण – तरूणी सहभागी होतात.

**या वर्षी हे शिबीर 15 ते 22 मे 2010 या कालावधीत प्रथमच लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा, ता. भामरागड, जि. गडचिरोली, महाराष्ट्र येथे संपन्न होत आहे.**

लोक बिरादरी प्रकल्प हा माडिया आणि गोंड या अतिमागास आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी 1973 साला पासून झटतो आहे. स्व. बाबा व साधनाताई आमटे यांनी सुरू केलेला हा प्रकल्प गेली 36 वर्षे डॉ. प्रकाश आमटे व डॉ. सौ. मंदाकिनी आमटे तसेच त्यांच्या सोबत काम करणारे अनेक कार्यकर्ते समर्थपणे चालवित आहेत.

**'दान माणसाला नादान बनविते'** हा संदेश देत बाबांनी हातापायांची बोटे झडलेल्या माणसांना जगण्याचा मार्ग शिकविला, त्यांना स्वावलंबी केले. अंध अपंग, मुकबधिर, अनाथ, सुशिक्षित बेरोजगार, आदिवासी इत्यादी उपेक्षित घटकांना सुध्दा त्यांच्या सेवेचा लाभ मिळाला. याचबरोबर **'भारत जोडो'** अभियानांद्वारे अखंड भारताचा नाराही दिला. देशभरातील बहूभाषिकांना, नानाविध प्रांतातील बांधवांना एकाच छत्राखाली आणले गेले.

बाबा म्हणत, ''तृप्तीकुंभ घेऊन माझे जीवन आता पैलतिराच्या प्रवासाला लागले आहे. सशक्त पिढीच्या खांद्यावर उद्याचे भविष्य ठेऊन मी निश्चिंत झालो आहे. आनंदवन ही एक जगाला सुंदर करण्याची चळवळ आहे. ज्यांनी स्वतःच्या आईचा चेहराही पाहिला नाही, त्यांनी येथे चमत्कार करून दाखविले.''

देशभरातून आलेले हजारो तरूण–तरूणी छावणी शिबीरात श्रमाचे संस्कार घेतात. मे च्या रणरणत्या उन्हात श्रम करतात. तेथे कोणतेही वर्कशॉप नसतं, कारण वर्कशॉप केवळ टॉकशॉप बनत चालले आहे. त्यामुळे छावणीत शिबीरार्थी निसर्गाशी समरस होऊन काम करतात, तेथे निर्माण झालेले काम पाहतात आणि प्रेरणा घेतात. त्याबरोबरच ज्वलंत प्रश्नांवरील विचारांची देवाणघेवाण करतात. यामध्ये विविध प्रांतातील संस्कृतीचे आदान–प्रधान होते. उद्याच्या समर्थ भारताचे स्वप्न तरूणाईकडूनच पुर्ण होईल, असा दुर्दम्य आशावाद बाबांनी शेवटच्या श्वासापर्यंत जपला होता. त्यांचे शब्द कृतीशील होण्यासाठी यावर्षीची श्रमसंस्कार छावणी सज्ज होत आहे. अशा प्रेरणादायी शिबीरात देशातील सर्वच प्रांताचे प्रतिनिधित्व असावे, अशी अपेक्षा आहे.

*या शिबिरात सर्व प्रांतातील, विभागातील सर्व तरूणांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे. शिबिरात सहभागी होऊ इच्छिणा-या युवक–युवतींनी खालील ठिकाणी संपर्क साधावा.*

**संयोजक –** अनिकेत प्रकाश आमटे

लोक बिरादरी प्रकल्प, हेमलकसा

पो. ता. भामरागड, जिल्हा – गडचिरोली

पिन कोड. 442710 महाराष्ट्र राज्य

ईमेल – hemalkasacamp@gmail.com & Website – www.lokbiradariprakalp.org

मोबाइल नं. – 9423646185, 9403300503, 9421729386



